■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – ३१४ ■ शुक्रवार दि.१ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 314 ■ Friday Dt. 1 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4



अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ


संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



## बीड जिल्ह्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती जल्लोषात साजरी

# अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात उत्साहाचे वातावरण; समाज परिवर्तनाचा निर्धार!









**बीड । प्रतिनिधी**

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड जिल्ह्यात मातंग समाजाच्या उपस्थितीने जनसागर उसळल्याचे दृश्य पाहायला मिळाले. विविध भागांतून आलेल्या नागरिकांनी ढोल–ताशांच्या गजरात, मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या जीवनकार्यावर आधारित व्याख्यानमाला, सांस्कृतिक कार्यक्रम व भव्य मिरवणुकीद्वारे समाजाने त्यांना अभिवादन केले.**

बीड शहरातील प्रमुख चौक, अण्णाभाऊ साठे यांचे विचार जागवणारे फलक, बॅनर आणि पोस्टर लावण्यात आले होते. यावेळी समाजबांधवांनी एकजुटीचा संदेश देत सामाजिक न्याय, शिक्षण, रोजगार आणि आरक्षणाच्या मुद्द्यांवर एकत्र येण्याचे आवाहन केले. उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊंच्या क्रांतिकारी विचारांची आठवण करून देत, त्यांच्या संघर्षातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. जयंतीनिमित्त बीड शहरात उत्सवमय वातावरण निर्माण झाले होते. पोलीस प्रशासनानेही योग्य बंदोबस्त ठेवत कार्यक्रम शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य केले. संपूर्ण बीड शहर अण्णाभाऊ साठेंच्या जयघोषांनी निनादत होते.

कार्यक्रमाच्या माध्यमातून अण्णाभाऊ साठेंनी दिलेला शिक्षण, श्रम आणि संघर्षाचा संदेश जनतेपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न झाला. तरुण पिढीने देखील मोठ्या संख्येने सहभाग घेत मातंग समाजाचे सामाजिक भान जपले. जयंतीनिमित्त बीड शहरातील रस्ते, चौक व परिसर भगव्या आणि निळ्या पताकांनी सजवण्यात आला होता. या जयंती निमित्ताने समाजाच्या विविध स्तरातून मिळालेला प्रतिसाद पाहता, अण्णाभाऊ साठे हे आजही लोकांच्या मनात जिवंत असल्याचे स्पष्ट झाले. बीड शहरात भरलेल्या या जनसागराने एकता, जागरूकता आणि परिवर्तनाची नवी दिशा दाखवली.











## महादेव मुंडे हत्या प्रकरणात ज्ञानेश्वरी मुंडेंच्या लढ्याला मनोज जरांगे पाटील यांचा पाठिंबा!

# ज्ञानेश्वरी मुंडे यांना न्याय मिळेपर्यंत मी थांबणार नाही : मनोज जरांगे पाटील








**बीड । प्रतिनिधी**

महादेव मुंडे हत्या प्रकरणाने राज्यात मोठा गाजावाजा झाला असून या प्रकरणात पीडित पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांना न्याय मिळावा, यासाठी मराठा आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील यांनी ठाम पाठिंबा दिला आहे. ज्ञानेश्वरी मुंडे यांचा लढा हा फक्त वैयक्तिक नाही, तर अन्यायाविरुद्धचा संघर्ष आहे. त्यांच्या लढ्याला मी माझा लढा समजतो आणि शेवटपर्यंत त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मी सोबत राहणार, असे स्पष्ट आश्वासन त्यांनी दिले. मनोज जरांगे पाटील यांनी बीड शहरात व्यापक बैठक बोलावली होती या बैठकीत ते बोलत होते. त्यांनी यावेळी प्रशासन आणि पोलीस यंत्रणेला इशाराही दिला की, या प्रकरणात कुणालाही वाचवण्याचा प्रयत्न झाला, तर जनआंदोलन उभे केले जाईल.

महादेव मुंडे यांच्या मृत्यूमागे कोण आहेत, याचा सखोल तपास व्हायला हवा. जे दोषी आहेत त्यांना कठोर शिक्षा झालीच पाहिजे, अशी मागणी करत जरांगे पाटलांनी पीडित कुटुंबाच्या बाजूने उभं राहत राज्य सरकारवर दबाव निर्माण करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या समर्थनामुळे ज्ञानेश्वरी मुंडे यांच्या लढ्याला आता नवा बळकटी मिळाल्याचं चित्र आहे. आता पुढील काळात प्रशासनाची भूमिका आणि तपासाची दिशा महत्त्वाची ठरणार आहे. ज्ञानेश्वरीला न्याय मिळेपर्यंत मी थांबणार नाही, असे ठणकावून सांगत त्यांनी या लढ्याला आपला लढा घोषित केला आहे. जरांगे पाटील म्हणाले, ही केवळ एका महिलेची न्यायासाठीची धडपड नाही, तर समाजात अन्यायाविरुद्ध उभा राहण्याचा संदेश आहे. जोपर्यंत दोषींवर कारवाई होत नाही, तोपर्यंत मी गप्प बसणार नाही. या वक्तव्यामुळे महादेव मुंडे हत्या प्रकरणाला अधिक गांभीर्य प्राप्त झाले असून प्रशासनावरील दबाव आणखी वाढला आहे. पीडित ज्ञानेश्वरी मुंडे यांना आता एका प्रभावी नेतृत्वाचा खंबीर आधार लाभल्याने या प्रकरणातील पुढील घडामोडीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# फिल्मी स्टाईलने दुचाकीस्वारांनी मुकादमाचे चार लाख रूपये पळवले!

## भरदिवसा थरार, अनोळखी दोघांवर गुन्हा दाखल

**केज । प्रतिनिधी**

चार लाख रूपयांची रक्कम पिशवीत ठेवून दुचाकीवरून गावाकडे निघालेल्या ऊसतोड मुकादमाच्या हातातील ती रक्कम अन्य एका दुचाकीवरून आलेल्या दोघांनी हिसकावून नेली. खळबळ उडवून देणारी ही घटना दि.२९ जुलै रोजी दुपारी साडेचार ते पाच वाजेच्या सुमारास केज उपजिल्हा रुग्णालयाजवळ घडली.

याबाबत उत्तरेश्वर उत्तम धायगुडे (रा. मानेवाडी ता. केज) यांनी केज ठाण्यात फिर्याद नोंदविली. ते त्यांचे मेहुणे रमेश वैजनाथ माने याने त्यांना देण्यासाठी अंबाजोगाई येथील एका बँकेतून चेकद्वारे काढलेले चार लाख रूपये घेऊन केज येथे आले होते. उत्तरेश्वर धायगुडे यांच्यासोबत त्यांचा मेव्हणा रमेश माने आणि पुतण्या अशोक धायगुडे हे तिघे दुचाकीवरून चार लाखांची रक्कम कॅरिबॅगमध्ये घेऊन केज येथे आले होते. ती रक्कम त्यांना आरटीजीएसद्वारे कोल्हापुर येथील शिरोली एमआयडीसीमधील एका इंजिनिरींग वर्कसच्या खात्यावर



नवीन ट्रॅक्टरच्या दोन ट्रॉली खरेदीसाठी पाठवायचे होती. परंतु त्यांना केजला यायला उशीर झाल्याने बँकेचा व्यवहार बंद झाल्यामुळे ते तिघे दुचाकीवरुन त्यांच्या गावी मानेवाडीकडे जाण्यासाठी निघाले. ते तिघे अंबाजोगाई रोडने जात असताना उपजिल्हा रुग्णालय केजपासून २०० मीटर अंतरावर असताना त्यांच्या पाठीमागून भरधाव आलेल्या दुचाकीवरील २५ ते २६ वयोगटातील दोघांनी उत्तरेश्वर धायगुडे यांच्या हातातील चार लाख रुपये असलेली कॅरिबॅग हिसकावून घेत अंबाजोगाई रस्त्याने दूचाकीवर धुम ठोकली. यावेळी उत्तरेश्वर धायगुडे यांनी आरडाओरड करुन त्या त्यांचा दोन कि मी पर्यंत पाठलाग केला, पण ते त्यांना सापडले नाहीत.

या प्रकरणी धायगुडे यांच्या फिर्यादीवरून केज ठाण्यात दोन अनोळखींविरुद्ध गुन्हा दाखल झाला. दरम्यान शहरात मुख्य चौकात बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज आधारे पोलिस तपास करीत आहेत. लवकरच हे आरोपी ताब्यात येतील. असे केज ठाणे निरीक्षक स्वप्नील उनवणे म्हणाले.

# गेवराईतील श्री. मंगलनाथ मल्टिपल निधी बँक घोटाळा चव्हाट्यावर;

# ठेवीदारांना चुना लावून चेअरमन केशव पंडीत फरार!

## शाखा कर्मचाऱ्यांकडून खातेदारांची दिशाभूल, केवळ आश्वासनांची खैरात?

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील श्री. मंगलनाथ मल्टिपल निधी बँकेतील ठेवीदारांना मोठा आर्थिक



फटका बसण्याची शक्यता असून, बँकेचे चेअरमन केशव पंडीत हे सध्या फरार आहेत. त्यांनी ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये घेऊन पलायन केल्याचा आरोप होत असून, गेल्या वर्षभरापासूनच त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने फरार होण्याची रणनीती आखल्याचे प्राथमिक माहितीनुसार समोर येत आहे. श्री. मंगलनाथ मल्टिपल निधी बँकेवर अनेक ठेवीदारांनी विश्वास ठेवून आपले पैसे गुंतवले होते. मात्र, काही दिवसांपासून बँकेची आर्थिक स्थिती डळमळीत झाली असून, ठेवीदारांना ना व्याज मिळाले ना मुळ रक्कम परत मिळाली. यामुळे शेकडो ठेवीदारांमध्ये संतापाचे वातावरण असून, त्यांनी पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यास सुरुवात केली आहे. ठेवीदारांचे म्हणणे आहे की, केशव शेषनारायण पंडीत यांनी योजनाबद्ध पद्धतीने विश्वासार्हता निर्माण करून पैसे उकळले आणि नंतर बँकेची फसवणूक करून गायब झाले. शाखेतील कर्मचाऱ्यांकडून खातेदार व ठेवीदारांची सातत्याने दिशाभूल केली जात




असल्याचा प्रकार समोर आला आहे. रक्कम परत मिळेल, असा केवळ आश्वासक दिलासा देत ठेवीदारांना थांबवले जात आहे. मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई किंवा पैसे परत मिळण्याची प्रक्रिया सुरू न झाल्याने ठेवीदारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कर्मचाऱ्यांच्या या उघड दिशाभूल करणाऱ्या भूमिकेवर कारवाईची मागणी होत आहे.

विशेष म्हणजे बँकेचे ऑडिट मागील तीन वर्षांत केवळ एकदाच हे ऑडिट बीड जिल्ह्याबाहेरील नगर येथील एका सीए मार्फत करण्यात आले होते. सततच्या तक्रारी असूनही ऑडिट नियमित न होणे आणि बाहेरच्या सीएला हे काम देण्यात आल्यामुळे आर्थिक गैरव्यवहार झाकण्याचा प्रयत्न झाला की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. आता या सीएच्या भूमिकेची सखोल चौकशी होणे गरजेचे असल्याची मागणी ठेवीदारांकडून होत आहे. श्री मंगलनाथ मल्टिपल निधी ही नवीन शाखा उद्घाटन झाल्यापासून आधीचे तात्कालीन कर्मचारी व अधिकारी वर्ग या सर्वांनी अधिकृत रित्या राजीनामा न देता थेट बँकेत न येणे पसंत केले ही बँक आर्थिक व्यवहारातून बाद झाली होती का? चेअरमन यांनी त्यांची नावे असलेली संपूर्ण प्रॉपर्टी विक्री केली त्यानंतर लग्न सोहळ्याचे कारण दाखवून कुटुंब गेवराईतून पसार केले याबाबत शाखेतील कर्मचाऱ्याला कुण कुण लागलीच नव्हती का ? शाखेत चाललेल्या गैरकारभाराबद्दल मॅनेजर, क्लार्क व इतर संचालक मंडळास माहित असताना संस्थेचा कारभार साखरझोपेत चालत होता का? चेअरमन यांचा नातेवाईक असलेला मामाचा मुलगा शाखेत कार्यरत असताना शाखेतूनच लाखो रुपयांचे लोन पास करून अचानक बँकेत न येणे त्यांनी पसंत केले यामागचे कारण काय?अद्याप समजू शकले नाही पण त्यांने रितसर राजीनामा न दिल्यामुळे त्याचा या सर्व प्रकरणाशी संबंध आहे असे बोलले जात होते तसेचशाखेतील मॅनेजर असलेले यांना याबाबत आधीच माहिती होती का मग राजीनामापत्र घेण्याची घाई का केली? आर्थिक घोटाळ्यात बीड जिल्हा प्रगतीपथावर असताना या शाखेचे मॅनेजर यांनी उसाचे बिल असलेले दहा लाख रुपये या शाखेत ठेवले असा गाजावाजा करतात मग या खरं आणि खोटं काय आहे हे समोर येणे गरजेचे आहे. केशव पंडित यांच्या निवासस्थानी राजरोजपणे कुटुंबासोबत बैठका होत असे या बैठकीत एक ढोंगी साधू महाराज व इतर कर्मचारी वर्ग सातत्याने उपस्थित असतं हा प्रकार सर्वांनी ठरवून केला की काय असा संशय व्यक्त होत आहे बँकेतील कर्मचाऱ्यांकडून सोनेतारण कर्जदार, ठेवीदार तसेच खातेदारांना सातत्याने संबंधित मोठ -मोठे उद्योग व्यवसायिक आमच्याकडे एफडी स्वरूपात पैसे जमा करणार आहेत आम्ही सर्वांचे पैसे परत करणार आहोत काळजी नसावी असे सांगत वेळ देत टाळाटाळ करण्यात येत असल्याचे बोलले जात आहे.

### बनावट सोने प्रकरण दाबले गेले? कर्मचाऱ्यांनी डोळेझाक का केली?

श्री. मंगलनाथ मल्टिपल निधी बँकेत चेअरमन तथा गोल्ड व्हॅल्युवर प्रशांत शेलार हे बनावट सोने गहाण ठेवण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू होते, अशी माहिती आता पुढे येत आहे. विशेष म्हणजे, हे प्रकार शाखेतील काही कर्मचाऱ्यांच्या आणि अधिकाऱ्यांच्या लक्षात येऊनही त्यांनी ही बाब पोलीस प्रशासन तथा बीड जिल्हा जिल्हाधिकारी व वरिष्ठांकडे उघड न करता दुर्लक्ष केले. त्यामुळे या गैरप्रकारात त्यांच्या सहभागाचा संशय व्यक्त केला जात आहे. फसवणुकीचे हे सगळे जाळे आधीच उघड पडले असते, तर आज अनेक ठेवीदारांचा आर्थिक बळी टळला असता, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

### ज्याच्याकडून पैसे, त्याला पाहुणचार; बाकींच्या वाट्याला 'तारीख पे तारीख'!

श्री. मंगलनाथ मल्टिपल निधी बँकेत खातेदारांमध्ये दुजाभाव केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. जे खातेदार अधिक रक्कम जमा करत होते, त्यांना विशेष पाहुणचार दिला जात होता, तर जे आपले पैसे मागायला येत होते, त्यांना तारीख पे तारीख देत शाखा कर्मचाऱ्यांकडून वारंवार टाळाटाळ करण्यात येत होती. या भेदभावामुळे अनेक ठेवीदारांनी नाराजी व्यक्त केली असून बँकेच्या कारभारातील ही अनियमितता आणि मनमानी लवकरच उघडकीस आणावी, अशी मागणी होत आहे.

### चेअरमन वेड्याचं सोंग, मॅनेजर अर्धांगवायूग्रस्त? पडद्यामागचं सत्य अजूनही अंधारात?

श्री. मंगलनाथ मल्टिपल निधी बँकेतील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात आणखी एक गूढ बाब समोर आली आहे. एकीकडे बँकेचे चेअरमन केशव पंडीत वेड्याचे सोंग घेत फरारी झाले आहेत, तर दुसरीकडे शाखा व्यवस्थापक तथा मॅनेजर अर्धांगवायू झाल्याचा गाजावाजा केला जात आहे. मात्र या दोन्ही गोष्टींचे सत्य काय? हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. खरोखरच आजारी आहेत की चौकशीपासून वाचण्यासाठी नाटच? असा सवाल आता ठेवीदार आणि नागरिकांमध्ये उपस्थित झाला आहे. या प्रकरणाचा तपशीलवार शोध घेण्याची मागणी आता तीव्र होत आहे.

विशेष म्हणजे हे सर्व प्रकार बँकेचे चेअरमन केशव शेषनारायण पंडीत यांच्या संगनमतानेच सुरू होते, असा संशय व्यक्त होत आहे. अनेक ठेवीदारांनी वेळोवेळी भेट घेण्याचा प्रयत्न केला, मात्र आज या वेळेस या, उद्या या अशा बहाण्यांनी फसवले गेले. त्यामुळे ही संगनमताने आखलेली फसवणुकीची साखळी होती का, याबाबत चौकशीची मागणी जोर धरत आहे.

---

## सरकारने भारतरत्न देऊन लोकशाहीर साहित्य रत्न डॉ.आण्णाभाऊ साठे यांचा सन्मान करावा : विनोद थोरात

**बीड । प्रतिनिधी**

शोषित पीड़ित वंचित कामगार यांच्यासाठी मोठा लढा उभारुन लेखन कविता पोवाडा लोकनाट्याच्या माध्यमातुन सामाजिक क्रांतिचे रणशिंग फुकुन दिड दिवस शाळेत गेलेल्या डॉ आण्णाभाऊ साठे यांनी पस्तीस उपन्यास तेरा लोकनाट्य पंधरा शाहिरी पोवाडे तेरा कहानी संग्रह सात चित्रपटाची कथा एक शाहिरी पुस्तक असलेला अनेक पुस्तकाचे व कांदबर्याचे लिखण लोकशाहीर साहित्य रत्न डॉ. आण्णाभाऊ साठे यांनी केले आहे.



वाटेगाव ते मुंबई पायी पदयात्रा काढण्यात डॉ आण्णाभाऊ साठे यांचे मोठे योगदान आहे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीला जगप्रसिध्द असलेली फकिरा हि कांदबरी अर्पण करणारे जग बदल घालूनी घाव मज सांगुन गेले भिमराव असे म्हणणारे लोकशाहीर साहित्यरत्न डॉ आण्णाभाऊ साठे यांना त्यांच्या १०५ व्या जयंतीदिनी भारत सरकारने मरणोत्तर भारतरत्न देण्यात यावी अशी मागणी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने मराठवाडा संघटक मा श्री विनोदभाऊ थोरात यांनी केली.



**वडवणी :** लऊळ २ येथे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरा करण्यात आली. त्यावेळी उपस्थित कृष्णा अडागळे, लखन अडागळे, गोविंद अडागळे, नंदू आढागळे, चंदू अडागळे, शरद अडागळे, आकाश शिंदे, दत्ता कुरे, अशोक शिंदे, सावता रसवे व इतर गावातील नागरिक उपस्थित होते.

---

## क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठानच्या पुरस्कार सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित रहा : मोहन गुंड

**बीड । प्रतिनिधी**

शेतकरी कामगार पक्ष व क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठानच्या वतीने २०२५ चे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा हस्ते हा पुरस्कार वितरण सोहळाचे ध्वजारोहण मा . आ.बाळाराम पाटील यांच्या हस्ते होणार आहे व कार्यक्रमाचे अध्यक्ष बीड जिल्हाचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, व उद्घाटन मा.आ.बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आ. कैलास पाटील (विधानसभा, कळंब) माजी आ. उषाताई दराडे (माजी आमदार) माजी आ. राजेंद्र जगताप (विधानसभा, बीड) आ. संदीप क्षीरसागर (विधानसभा, बीड) माजी आ. सय्यद सलीम (विधानसभा, बीड) संगीता ठोंबरे (माजी आमदार, केज राहल सोनवणे (जिल्हाध्यक्ष, काँग्रेस बीड) चित्राताई गोळेगावकर (राज्यविटणीस मंडळ सदस्या, शेकाप, परभणी)कॉ. रोहिदास जाधव (राज्याध्यक्ष, एसएफआय) प्रा.पंडीत तुपे (जिल्हाध्यक्ष युक्रांद, बीड) मा. गणेश मस्के (जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड बीड)सुमित वाघमारे (जिल्हाध्यक्ष, बामसेफ, बीड) ॲड. शिवाजी कांबळे (जिल्हाध्यक्ष समाजवादी पार्टी, बीड)माजी आ. जनार्धन तुपे (विधानसभा, चौसाळा) भाई.प्रा.डॉ. उमाकांत राठोड (कार्यालयीन सहचिटणीस, सेकाप) मा. राजेंद्र मस्के (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी, शरद पवार गट)कॉ. भाऊराव प्रभाळे (जिल्हा सेक्रेटरी, भाळप बीड) ॲड. नारायण गोले पाटील (मध्यवर्ती समिती सदस्य, शेकाप) प्रा. सुभाष जाधव (जिल्हाध्यक्ष, शिवसंग्राम बीड) राहुल वायकर (विभागीय अध्यक्ष, संभाजी बिग्रेड, बीड) मा. राजकुमार घायाळ (उपाध्यक्ष, महाराष्ट्र हमाल मापाडी महामंडळ) कॉ. ॲड. अजय बुरांडे (माकम, जिल्हा सचिव बीड) मा. राजेश घोडे (आझाद कांती सेना प्रमुख्छ, माजलगाव)भाई विष्णुपंत घोलप (जिल्हा चिटणीस शेकाप, बीड) अजय सरवदे (जिल्हाध्यक्ष, वंचित आधाही पश्चिम बीड) ज्योतीताई विनायक मेटे (अध्यक्षा, शिवसंग्राम) (राज्य प्रवक्ता तथा जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पंवर सेना बीड) नितीन सोनवणे, विलास काळके (जिल्हाध्यक्ष, प्रहार, बीड) सुशिलाताई मोराळे (ज्येष्ठ नेत्या, बीड) कॉ. नामदेवराव चव्हाण (माकप, राज्य सचिव मंडळ सदस्य बीड) भाई. चंद्रकांत चव्हाण (राज्याध्यक्ष, शिक्षक आधाडी, सेकाप) भाई. दिगांबर कांबळे (राज्याध्यक्ष महा. बाधीत थे. आघाडी, शेकाप) शफीक भाऊ शेख (जिल्हा अध्यक्ष, चखच्, बौड) भाई सय्यद शाकेर (डघझ ग्रुप बीड) (जिल्हाध्यक्ष, डीपी.आय बीड) सुभाष लोणके, अशोक येडे (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी, बीड यामध्ये कृषी, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, कला, क्रीडा व इतर क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा क्रांतिसिंह नाना पाटील विकास प्रतिष्ठानच्या वतीने हा गुणगौरव सोहळा संपन्न होणार आहे. यामध्ये राजकीय क्षेत्रामध्ये विस्थापित असलेल्या समाजामध्ये लढा देऊन राजकारणामध्ये लोकशाहीमध्ये सर्वांना सर्व अधिकार आहेत हे दाखवून देण्याचे काम केले आहे. असे, अरुण जाधव यांना राजकीय पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच ज्यांनी आजपर्यंत हजारो झाडं वाटण्याचे आणि जीवनमान उंचावण्याचं काम ज्यांनी केलं. कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणारे राजाभाऊ देशमुख यांना कृषी पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच पर्यावरण संवर्धन ठेवून समाजामध्ये जनजागृती करण्याचं काम असे सुधाकर देशमुख यांना पर्यावरण संरक्षण व संवर्धन हा पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच व्यसनाधीन झालेल्या समाजांना माणसांमध्ये आणण्याचे काम करतात व ज्यांचे संसार उध्वस्त होत आहेत,त्यांना चांगल्या मार्गामध्ये आणण्याचे काम जे करतात असे डॉ. संदीप तांबारे यांना आरोग्य संवर्धन हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

सोबतच ज्यांनी आपल्या शाहिरीच्या माध्यमातून महाराष्ट्रभर समाज प्रबोधन करतात असे अकलूज येथील शाहीर राजेंद्र कांबळे यांना सांस्कृतिक कला हा पुरस्कार जाहीर झाला आहे. व शैक्षणिक क्षेत्रामध्ये कॉ राजकुमार कदम यांना जाहीर झालेला आहे. व कामगार चळवळ ज्यांनी मोठ्या हिरीरीने चालवण्याचं काम केलं अशा उज्वला पडलवार यांना कामगार चळवळ हा पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच, सांप्रदायिक क्षेत्रात ह.भ.प श्यामसुंदर सोन्नर यांना सांप्रदायिक व ज्यांनी शोध पत्रकारिता जगासमोर मांडण्याचं काम केलं असे संपत मोरे सांगली यांना शोध पत्रकारिता हा पुरस्कार जाहीर झाला आहे. व क्रीडा क्षेत्रामध्ये ज्यांनी उल्लेखनीय काम केलेले आहे, अशा जागृती अमरजीत तिवारी धारूर यांना क्रीडा क्षेत्रातील पुरस्कार जाहीर झाला आहे. अशा विविध मान्यवरांचा सत्कार सोहळा क्रांतिसिंह नाना पाटील विकास प्रतिष्ठानच्या वतीने व विविध मान्यवरांच्या हस्ते या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. लवकरच हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.

**नोकरी नोकरी**

हायवा टिप्पर, जेसीबीसाठी ड्रायव्हर पाहिजेत. (मुंबई, ठाणे लोकल) राहणे+खाणे फ्री. योग्य पगार दिला जाईल.

संपर्क :: **वाघमारे**
८३२९५५०२०९

---

# अभिवादन तुजला लोकशाहीरा

तुकाराम भाऊराव साठे ऊर्फ अण्णा भाऊ साठे (ऑगस्ट १, इ.स. १९२० – जुलै १८, इ.स. १९६९) हे मराठी लेखक व समाजसुधारक होते. वर्गविग्रहाचे तत्त्वज्ञान सर्वसामान्य जनांपर्यंत पोहोचविणारा, महाराष्ट्राच्या ग्रामीण मातीतील बोली आणि कलांचा संस्कार घेऊन आलेला सिद्धहस्त कादंबरीकार, लोकनाट्यकार म्हणून त्यांची प्रतिमा आहे. ग्रामीण ढंगातील रांगड्या तमाशाला 'लोकनाट्यत्र्क हे बिरुद शाहीर अण्णा भाऊ साठे यांनी दिले. संदर्भ हवा. अण्णा भाऊंनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकनाट्यांद्वारे जनजागृतीसाठी प्रयत्न केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून निर्माण झालेल्या मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याच्या नवनिर्मितीत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, अमर शेख व शाहीर कॉ. द.ना. गव्हाणकरांचे मोलाचे योगदान होते. अण्णा भाऊ साठे हे अंतर्बाह्य मार्क्सवादी होते. अण्णा भाऊ साठे म्हणजे जातींच्या उतरंडीमुळे शिक्षणापासून, समग्र विकासापासून वंचित राहिलेल्या मातंग समाजातील एक समृद्ध व्यक्तिमत्त्व होते. वैयक्तिक दु:खांचा विचार न करता; आपले विचार, कार्य व प्रतिभा यांच्या साहाय्याने लोककलेला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे आणि वंचितांच्या व्यथा प्रभावीपणे मांडणारे लोकशाहीर होते.

लेखन:-

अण्णा भाऊ साठे यांनी ३५ कादंबर्या, ८ पटकथा, ३ नाटके, एक प्रवासवर्णन, १३ कथासंग्रह, १४ लोकनाट्ये, १० प्रसिद्ध पोवाडे व १२ उपहासात्मक लेख लिहिले. बंगालचा दुष्काळ, तेलंगण संग्राम, पंजाब-दिल्लीचा पोवाडा, अंमळनेरचे हुतात्मे, काळ्या बाजाराचा पोवाडा, 'माझी मैना' हा संयुक्त महाराष्ट्र चळवळीवरील छक्कड, कामगार चळवळीवरील 'एकजुटीचा नेता' ते हिटलरच्या फॅसिझम विरोधात स्टॅलिनग्राडचा पोवाडा, बर्लिनचा पोवाडा, चिनी क्रांतीवरील 'चिनी जनांची मुक्तिसेना' हे गौरवगान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील गाजलेले 'जग बदल घालुनी घाव-सांगुनी गेले भीमराव' हे गाणे, अशी अनेक गाणी, कवने, पोवाडे अण्णा भाऊ साठे यांनी रचले. त्यांनी आपल्या गाण्यांतून, पोवाड्यांतून अनेक सामाजिक, राजकीय प्रश्नांना, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय समस्यांना वाचा फोडण्याचे महान कार्य केले आहे.

जीवन:

ऑगस्ट १, इ.स. १९२० रोजी सध्याच्या सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या गावी मांग कुटुंबात अण्णा भाऊ साठे यांचा जन्म झाला. हे गाव पूर्वी कुरुंदवाड संस्थानात होते. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव व आईचे नाव वालुबाई होते. या दांपत्याने जन्मलेल्या मुलाचे नाव तुकाराम ठेवले असले तरीही सर्वजण प्रेमाने त्याला अण्णा म्हणत.

अण्णा भाऊ साठे यांची दोन लग्ने झाली होती. दुसर्या पत्नीचे नाव जयवंताबाई. अण्णांप्रमाणेच याही साम्यवादी पक्षाच्या कार्यकर्त्या होत्या. शांताबाई आणि शकुंतलाबाई या त्यांच्या दोन मुली. आई आणि घरातील मोठे लोक दोर वळण्याच्या कामाला जात. त्यांचे वडील पोटापाण्यासाठीच मुंबईत राहत असत. त्यामुळे लहान भावंडांना सांभाळण्याची



जबाबदारी तुकारामांवर (अण्णांचे मूळ नाव) म्हणजेच अण्णा भाऊंवर होती. त्यांच्या वडिलांनी मुंबईत उच्चभ्रू आणि उच्चशिक्षित समाज पाहिल्याने आपल्या मुलांनी शिकले पाहिजे अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्या आग्रहामुळेच वयाच्या १४ व्या वर्षी अण्णांनी प्राथमिक शिक्षणाला सुरुवात केली. परंतु तत्कालीन मागास जातींतील मुलांसाठी त्या काळी वेगळ्या शाळा होत्या. त्या मुलांशी शिक्षकांचे वर्तनही निर्दयीपणाचे होते. वाढलेले वय, सदोष शिक्षण पद्धती यांमुळे अण्णा फार दिवस शाळेत गेलेच नाहीत.

लहानपणापासूनच त्यांना विविध छंद होते. मैदानी खेळ खेळण्याचा त्यांचा पिढीजात वारसा असल्याने दांडपट्टा चालविण्यात त्यांचा हात धरणारा कोणी नव्हते. याशिवाय जंगलात एकटे भटकणे, पोहणे, मासेमारी, शिकार करणे, विविध पक्षांशी मैत्री करणे, जंगलातील पानाफुलांमधील सूक्ष्म फरक शोधणे असे एक ना अनेक छंद त्यांना होते. या छंदांमध्ये निरागसपणे बागडण्यातच त्यांचे बालपण गेले. मोठे होत असताना त्यांच्या आवडींमध्ये वाढच होत होती. लोकगीते पाठ करून ती टिपेच्या आवाजात म्हणणे, पोवाडे, लावण्या पाठ करणे, इतरांना त्या आत्मीयतेने म्हणून दाखवणे या छंदांमुळे त्यांच्याभोवती नेहमीच मित्र मंडळी जमलेली असत. रेठर्याच्या जत्रेत त्यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांचे भाषण ऐकले. त्याचा परिणाम अण्णा भाऊंवर झाला आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होऊ लागले.चळवळीत सामील होऊन लोकनाट्यांत छोटी मोठी कामे त्यांनी केली. याच काळात दुष्काळ पडल्याने अण्णांच्या वडिलांनी आपल्या कुटुंबाला मुंबईत न्यायचे ठरविले. त्याच वेळी अण्णा भाऊंचे बालपण संपले. वयाच्या ११ व्या वर्षी अण्णा आपल्या आई-वडिलांबरोबर मुंबईत आले. हे कुटुंब भायखळ्याच्या चांदबीबी चाळीत राहायला गेले. त्या काळी मुंबईत स्वस्ताई असल्याने सुरुवातीचा काळ सुखाचा गेला. मुंबईत फिरताना दोन गोष्टींकडे ते आकर्षिले गेले, एक म्हणजे विविध राजकीय संघटना आणि दुसरे म्हणजे मूक चित्रपट.

विविध राजकीय संघटनांचे ध्येय ब्रिटिशांना हाकलून देणे हेच होते. परंतु प्रत्येकाची विचारसरणी वेगळी होती. यांपैकी कम्युनिस्ट विचारसरणीचे अण्णा अनुयायी बनले. पक्षाच्या सभांचे आयोजन करणे, वॉलपेंटिंग करणे, हॅण्डबिले वाटणे, मोर्चे काढणे, छोट्या-मोठ्या सभेसमोर गोष्टी सांगणे, पोवाडे, लोकगीते म्हणून दाखविणे या सर्व गोष्टींमुळे कम्युनिस्ट वर्तुळात ते सर्वांना एकदम हवेहवेसे झाले. याच वेळी त्यांच्या तुकाराम या नावाचे अण्णा या नावात रूपांतर झाले.

मुंबईत पोटासाठी वणवण भटकत असताना अण्णांनी हमाल, बूट पॉलिशवाला, घरगडी, हॉटेल बॉय, कोळसे वाहक, डोअरकीपर, कुत्र्याला सांभाळणारा, मुलांना खेळविणारा, उधारी वसूल करणारा, खाण कामगार, ड्रेसिंगबॉय अशी नाना प्रकारची कामे केली. यावरून त्यांच्या कष्टमय जीवनाची आपल्याला कल्पना येते. या काळातच त्यांना सिनेमा पाहण्याचा छंद लागला. या छंदानेच त्यांना साक्षर बनविले. चित्रपटांच्या पाट्या, रस्त्यावरील दुकानांच्या बोर्डवरील अक्षरे जुळवित ते साक्षर झाले. या अक्षर ओळखीनंतरच त्यांना वाचनाची आवड निर्माण झाली. वयाच्या १७-१८ व्या वर्षी संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी अण्णांवर आली होती. गिरणी कामगार म्हणून त्यांच्या जीवनाला सुरुवात झाली होती. परंतु कोहिनूर मिलमधील नोकरी सुटल्याने त्यांच्यावर मोठेच संकट आले. या वेळी पुन्हा साठे कुटुंब वटेगावला आले. मुंबईतील धकाधकीचे जीवन, मोर्चे, सभा, सत्याग्रह, आंदोलने या सर्व गोष्टी पाहिलेल्या अण्णा भाऊंना वटेगावमध्ये राहणे शक्य होत नव्हते. अत्यंत अस्वस्थतेत त्यांनी घर सोडले आणि ते त्यांच्याच नातेवाईकांच्या तमाशाच्या फडात सामील झाले. अण्णा भाऊंचा धारदार आवाज, त्यांचे पाठांतर, पेटी, तबला, ढोलकी, बुलबुल ही वाद्ये वाजवण्याची कला या गुणांमुळे त्यांचे तमाशात स्वागतच झाले.

कार्य:-

अण्णा भाऊ साठे हे लावण्या, शाहिरी काव्ये, पोवाडा या लोककलांमध्ये तरबेज होते. मराठीभाषिक स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीकरता इ.स. १९५० च्या दशकात चाललेल्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांनी लोककलेच्या माध्यमातून लोकप्रबोधन घडवून आणले. अण्णा भाऊ साठे यांची वगनाट्येही अत्यंत महत्त्वाची आहेत. या वगनाटयांसाठी अण्णा



भाऊंनी तमाशा या महाराष्ट्रातील पारंपरिक लोककलेचा आकृतिबंध स्वीकारला. तमाशाच्या पारंपरिक सादरीकरणातील गण, गवळण, बतावणी आणि वग या घटकांपैकी गण, काही प्रमाणात बतावणी आणि वगनाटय हे तीन घटकच अण्णा भाऊंनी स्वीकारले. असे असले तरी तमाशाच्या पारंपरिक आकृतिबंधात अण्णा भाऊंनी वगनाटयाच्या रूपाने पुष्कळ बदल घडवून आणले. अकलेची गोष्ट, शेटजींचे इलेक्षन, बेकायदेशीर, माझी मुंबई अर्थात मुंबई कोणाची?, मूक मिरवणूक, लोकमंत्र्यांचा दौरा, खापर्या चोर, बिलंदर बडवे यांसारखी वगनाटये अण्णा भाऊंनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाची पायाभरणी करण्यासाठी लिहिली. त्यांतील गरुडाला पंख, वाघाला नखं तशी ही (मुंबई) मराठी मुलुखाला हे कवन संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत विलक्षण गाजले. अण्णा भाऊ साठे यांनी लिहिलेली प्रसिद्ध छक्कड(लावणीचा एक प्रकार) म्हणजे 'माझी मैना गावाकडं राह्यली'. या एका काव्यरचनेमुळे अण्णा भाऊ साठे यांचे नाव मराठी साहित्यात अविस्मरणीय असेल.

ड्ढट्ट पुरस्कार आणि सन्मान:- पहिल्या दलित साहित्य संमेलनाचे उद्घाटक (१९५८)

१९६१ साली, अण्णा भाऊ साठे यांच्या फकिरा या कादंबरीला महाराष्ट्र सरकारचा सर्वोत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला. तत्कालीन ज्येष्ठ साहित्यिक वि.स. खांडेकर यांनीही कादंबरीचे कौतुक केले होते. अशा या महान साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन..!

**विष्णूबाळ दत्तात्रय झोडगे**
८६६८२१२३३१
समदीप सामाजिक प्रतिष्ठान बीड
महाराजा मित्र मंडळ बीड
तिरुपती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल बीड

# मोहम्मद रफींच्या सदाबहार गीतांनी रसिक श्रोते मंत्रमुग्ध

## बीडसह जालना जिल्ह्यातून आलेल्या रसिकांनी दालन ओसंडून वाहिले

**बीड । प्रतिनिधी**

चित्रपटसृष्टीतील सुरांचे बादशहा-तानसेन म्हणून जगभरात ज्यांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते, ज्यांच्या गायन कले समोर रसिक श्रोते नतमस्तक होतात, असे दिवंगत पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या ४५ व्या पुण्यतिथी निमित्ताने पीस बुक डेपो कडून संचालक तथा गायक एम.एम.शेख यांनी दरवर्षीप्रमाणे यावेळीही घेतलेल्या एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम या कार्यक्रमात संगीतप्रेमींचा महापूर लोटला. मंत्रमुग्ध झालेल्या रसिक श्रोत्यांनी दालन अक्षरशः ओसंडून वाहिले.




बीड शहरात गायक एम.एम.शेख यांनी जिल्हाभरातील इतर गायक-गायिकांना सोबत घेत गायकांचा एक संच तयार केला आहे. हे सर्वजण मिळून अजरामर पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने दरवर्षी ३१ जुलै रोजी एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम हा कार्यक्रम विनामूल्य आयोजित करतात. या कार्यक्रमाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. यावेळी तर जालना रोड वरील संग्राम हॉटेल च्या दालनात घेण्यात आलेल्या कार्यक्रमास फक्त बीड शहरच नाही तर जिल्हाभरातून तसेच शेजारील जालना जिल्ह्यातून सुद्धा रसिक श्रोते खास कार्यक्रमासाठी आले होते. दालन अपूरे पडल्याने अनेक रसिक श्रोत्यांना माघारी जावे लागले. एवढी प्रचंड आत्मीयता रफी साहेबांच्या गाण्यांप्रती आजही रसिक श्रोत्यांमध्ये आहे. याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला. कार्यक्रमात एम.एम.शेख यांच्यासह ज्येष्ठ संगीत विशारद-गायक शेख मझहरुद्दीन, आकाश जाधव, संध्या जाधव, प्रियंका भंडारी, सय्यद मुजीब, निशा उजगरे, शेख सैलानी, ॲड. वर्षा दळवी, अश्विनी दळवी, ज्येष्ठ गायिका शकुंतला ससाने, शकुंतला खरात, सुप्रसिद्ध दंतचिकित्सक डॉ. साळवे, शेख ज़हीर आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी गाणी सादर केली.

रफी साहेबांच्या एकापेक्षा एक अशा रोमँटिक, दर्दी सदाबहार आणि देशप्रेमावरील गाण्यांसह रफी साहेबांच्या नावाने ना फनकार तुझसा तेरे बाद आया, मोहम्मद रफी तू बहुत याद आया या गाण्याने रफी साहेबांना श्रद्धांजली वाहण्यात आली. संपूर्ण कार्यक्रमाचे खुमासदार सूत्रसंचालन गायक, निवेदक तथा गीतकार आकाश जाधव यांनी अत्यंत कल्पकतेने केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व रसिक श्रोत्यांसह या कार्यक्रमास वृत्तपत्रातून ठळक प्रसिद्धी दिलेल्या सर्व वृत्तपत्रांचे संपादक व पत्रकारांचे, आयोजक एम.एम.शेख आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी मनस्वी आभार व्यक्त केले.

# लिंबागणेश येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती उत्साहात साजरी

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी त्यांना विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. प्रमुख उपस्थितीत माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, बाळकृष्ण थोरात हे मान्यवर होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी तर आभार प्रदर्शन औदुंबर थोरात यांनी केले.



डॉ. गणेश ढवळे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर भाष्य करताना सांगितले की, लोकनाट्यांद्वारे समाजप्रबोधन करणारे अण्णाभाऊ साठे हे वंचितांच्या वेदना प्रभावीपणे मांडणारे थोर साहित्यिक होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांचे मोलाचे योगदान होते. कार्यक्रमास दामोदर थोरात, समीर शेख, सुरेश निर्मळ, बाळकृष्ण मुळे, विक्रांत वाणी, औदुंबर नाईकवाडे, अजय थोरात, दादा गायकवाड, अशोक जाधव, जीवन मुळे, विठ्ठल कदम, तुकाराम गायकवाड आदी. ग्रामस्थ उपस्थित होते. अण्णाभाऊ साठे सार्वजनिक उत्सव समिती गठित करण्यात आली असून पदाधिकाऱ्यांची निवड खालीलप्रमाणे करण्यात आली. अध्यक्ष बापू थोरात, उपाध्यक्ष राजेंद्र थोरात, सचिव अशोक थोरात, कोषाध्यक्ष नितीन थोरात, सल्लागार अनिल थोरात, सदस्य म्हणून औदुंबर थोरात, बालु थोरात, तुळशीराम पवार, संतोष थोरात, कृष्णा थोरात, गणेश थोरात, रमेश थोरात, बन्सी निर्मळ आदींची निवड झाली. ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच बालासाहेब जाधव यांच्या हस्ते नविन पदाधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



## अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे : प्रा.रोडे

**बीड । प्रतिनिधी**

दि.१ रोजी अण्णाभाऊ यांना विनम्र अभिवादन! अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक हे त्यांच्या या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करताना दिसतात. संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर द.न. गव्हाणकर यांनी केले. मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सीमाभागातील अनेक ठिकाणी शाहिरांनी आपल्या लालबावटा कलापथकाचे कार्यक्रम सादर केले. अशा साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी उपस्थित तुलसी शैक्षणिक समूह संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे सर, प्रा.राम गायकवाड, प्रा.अंकुश कोरडे, सामाजिक कार्यकर्त्या किस्किंदा पांचाळ, प्रा.किशोर वाघमारे, बबन पांचाळ, आयु.अभय इंगोलेसह उपस्थित होते.

# संस्कार विद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी

**बीड । प्रतिनिधी**

संस्कार विद्यालयात इयत्ता तिसरी चौथी विभागात अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून काळे ताई व पानखडे ताई तसेच विभाग प्रमुख सुरेश गिरी सर अध्यक्ष म्हणून लाभले. या कार्यक्रमांमध्ये तिसरीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या बद्दल माहिती सांगितली.



पानखडे ताई यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जीवन परिचय करून दिला. तसेच काळे ताई यांनी लोकमान्य टिळक यांच्या बद्दल माहिती सांगितली. विभागाचे विभाग प्रमुख गिरी सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साळुंके ताई यांनी तर आभारप्रदर्शन कांबळे सर यांनी केले. कार्यक्रमास सर्व विद्यार्थी व शिक्षक वृंद उपस्थित होते.

# भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या बीड तालुकाध्यक्षपदी जिया शेख यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

सन २००८ सालापासून दिवंगत गोपीनाथराव मुंडे साहेबांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जाणारे जिया भाई शेख यांची भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या बीड तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. याबद्दल जिया शेख यांचे पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून अभिनंदन होत असून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.



जिया भाई शेख हे मुंडे साहेबांच्या हयातीत आणि त्यांच्या मृत्यू पश्चात सुद्धा मुंडे भगिनी आणि भाजप सोबत एकनिष्ठतेने कार्य करीत आहेत. त्यांच्या कार्याची व एकनिष्ठतेची दखल घेत राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे, माजी खासदार प्रितमताई मुंडे, केज मतदार संघाच्या आमदार नमिताताई व अक्षयजी मुंदडा आणि नंदकिशोर मुंदडा व युवा नेते पनगेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन अक्षयजी नंदकिशोर मुंदडा, भाजप जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख, तालुकाध्यक्ष राणा दादा डोईफोडे यांच्या आदेशाने भा.ज.प. अल्पसंख्यांक मोर्चा बीड तालुका अध्यक्षपदी जिया भाई शेख यांची निवड करण्यात आली आहे. याबद्दल पक्षीय पातळीसह समाजातील नागरिकांकडून अभिनंदन होत असून पुढील कार्यासाठी हृदय शुभेच्छा दिल्या जात आहेत. याबद्दल जिया भाई शेख यांनी सर्व अभिनंदनकर्त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत.

# संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंती निमित्त राज्यभर उत्सव साजरा करण्याचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज यांचे सन २०२५हे सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी ७५०वी जयंती वर्ष असून, येत्या गोकुळ अष्टमी दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांची ७५० वी जयंती साजरी होणार आहे. या निमित्ताने महाराष्ट्र शासनाने सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठ्या प्रमाणावर उत्सव साजरा करण्याचे आदेश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगर परिषदा यांनी संतश्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज यांच्या प्रतिमा किंवा मूर्तीची पालखीतून



मिरवणूक काढून सार्वजनिक रीतीने हा महोत्सव साजरा करावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

नागरीस्थानिक स्वराज्य संस्थांनी या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि उत्सवाच्या आयोजनात आवश्यक ती दक्षता घ्यावी, असेही शासनाच्या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. शासनाने या संदर्भातील अधिकृत परिपत्रक दि.३० जुलै २०२५ रोजी जाहीर केले असून, नगरविकास विभागाचे अपर सचिव अनिलकुमार आर.उगले यांच्या सहीने हे परिपत्रक प्रसारित करण्यात आलेले आहे. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी सज्ज राहावे आणि संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या कार्याचा गौरव करावा असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान या शासन निर्णयाचे समस्त ब्राह्मण संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी स्वागत केले असून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत. या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.



# सिरसाळा येथे अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**सिरसाळा । प्रतिनिधी**

सिरसाळा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येते सत्यशोधक लोकशाही कामगार नेते थोर साहित्यिक लोककवी अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्तनभ विनम्र अभिवादन करण्यात आले. वंचित सोशितांच्या कल्याणासाठी त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष केलेले आपल्या सर्वांना प्रेरणा देणारे महान साहित्यिक व लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्ताने यावेळी उपस्थित सिरसाळ्याचे ग्रामपंचायतचे मा. सरपंच राम दादा किरवले, ग्रा. सदस्य नयुम शेख, शरद कांबळे, रणजित रोडे, डि.एम. मिसाळ, गोविंद लोखंडे, लक्ष्मण बापु शिदे, मा.ग्रा.सदस्य लखण किरवले, बाबासाहेब किरवले, कैकाडी समाजाचे युवा नेते तात्या जाधव, नाना किरवले, मोतीराम गायकवाड या वेळी बहुसंख्याने समाज बांधव उपस्थित होता.

# दिंद्रुडच्या माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थीप्रिय शिक्षिका पुष्पा खोत यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

येथील माध्यमिक विद्यालयातील इंग्रजी विषयाच्या विद्यार्थीप्रिय शिक्षिका पुष्पा खोत (गंगणे) यांना सेवापुर्ती निमित्त निरोप देण्यात आला. शिक्षक सहकाऱ्यांनी त्यांचा पती नरसिंग गंगणे यांच्या समवेत शाल, श्रीफळ, पुष्पहार व आहेर देऊन सत्कार केला. सिंदफणा शिक्षण प्रसारक मंडळात तब्बल ३१ वर्ष निर्विवाद सेवा करून हजारो विद्यार्थी घडवणाऱ्या खोत मॅडम यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्यासाठी पंचक्रोशीतून विद्यार्थी, स्नेहीजन, नातेवाईक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिंद्रुड येथील भव्य सभागृहात पार पडलेल्या या निरोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी कै.डॉ.सोनाजीबापू रांजवण माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक जी. व्ही.उजगरे होते.




तर प्रमुख पाहुणे म्हणून माध्यमिक विद्यालय वडवणीचे मुख्याध्यापक के.बी.भोसले, टाकरवन चे मुख्याध्यापक दीपक राऊत, देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर, पर्यवेक्षक लखमावाड, प्रा.रावसाहेब देशमुख, डॉ.सायली गंगणे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी पत्रकार प्रकाश काशीद, संतोष स्वामी, अमोल ठोंबरे, नागेश वखरे, गणेश गटकळ आदींची समायोचित भाषणे झाली.

यावेळी सत्काराला उत्तर देताना पुष्पा खोत म्हणाल्या की, स्व.डॉ.सोनाजीबापू रांजवण व प्रा.नारायण बप्पा शिंदे यांनी माझ्यासारख्या शेतकऱ्याच्या मुलीला संस्थेत सेवा करण्याची संधी दिली याचे ऋण आयुष्यभर फेडता येणार नाही. मात्र त्यांनी दिलेल्या संधीचे सोने करताना आई-वडिलांचे संस्कार पावलोपावली कामी आले. जगाची संपर्क भाषा असलेला इंग्रजी विषय शिकवताना विद्यार्थी केंद्रबिंदू मानून काम केले. संस्थेत वेगवेगळ्या ठिकाणी काम करताना शिक्षक सहकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. संस्थाचालक शिवाजीभाऊ व प्रतापभैय्या रांजवण व मुख्याध्यापकांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे निर्विवाद सेवा करता आली. वेगवेगळ्या क्षेत्रात आपले विद्यार्थी उल्लेखनीय काम करतात हे पाहून मनस्वी आनंद होत असल्याचेही खोत म्हणाल्या. या सर्व वाटचालीत पती नरसिंग गंगणे व मुलगी डॉ. सायली गंगणे यांची अमूल्य साथ लाभल्याचेही त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ए.एस. नाईकनवरे यांनी तर आभार एस.जी.ठोंबरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एस.एस. बारवकर, डी.बी.वायबसे, एम.टी. भुसारे, डी.व्ही.कटारे, बी.व्ही. डावकर, डी.पी.रायकर, एस.पी. कोठुळे आदींसह सर्व शिक्षक, शिक्षीका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद बीड च्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करताना समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य अँड.सुभाष भाऊ राऊत, नानासाहेब मस्के, शहराध्यक्ष निखील शिंदे, नितीन राऊत, धनंजय काळे, अजिंक्य सुरवसे, तुषार लोंढे यांच्यासह समता सैनीक उपस्थित होते.




**कडा** – संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कडा येथील तीन शाळेत शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी सर्व जाती धर्माचे समाज बांधव उपस्थित होते.



जिल्हा रुग्णालय बीड बर्न वॉर्ड येथे अण्णा भाऊ साठे यांची जयंती उत्सव साजरी करण्यात आली. यावेळी मेट्रन, रमा गिरी मॅडम, कुलकर्णी मॅडम. जरांगे साहेब, बाजपेयी मॅडम व वॉर्ड मधील सर्व अधिकारी कर्मचारी यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली.





शिरसमार्ग ग्रामपंचायत कार्यालय मध्ये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे १०५ जयंती उत्सवात साजरी करण्यात आली शिरसमार्ग.





डॉ. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती सिरसमार्ग येथे मोठ्या उत्सवात साजरी १०५ वी विनम्र अभिवादन जयंती साजरी पांडुरंग तात्या कोळेकर, अनिल काका पवळ, नारायण आप्पा कोळेकर, सुधाकर उमाप, संजय उमाप, बाळू उमाप, बाळू चंद्रकांत उमाप, बारकू उमाप, दीपक ढवळे, संचार उमाप, राजेश उमाप, रामेश्वर भिसे, मच्छिंद्र उमाप, गणेश उमाप, पवन उमाप, गणेश भिसे, अविनाश उमाप, लखन, विवेक उमाप, वारणेचा वाघ प्रतिष्ठान सिरसमार्ग.



बहुजननायक, थोर विचारवंत, कवी, साहित्यरत्न, प्रबोधनकार, समाज सुधारक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त आण्णाभाऊ साठे चौक, बीड येथे अण्णाभाऊ साठे यांना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करताना सामाजिक कार्यकर्ते अशोक दादा ढोले व प्रकाश तावरे सर्वांना जयंतीनिमित्त हार्दिक शुभेच्छा.

# टाकरवणमध्ये सोन्याचे दुकान फोडण्याचा चोरट्यांचा मोठा प्रयत्न फसला

## सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे कनेक्शन कट केले टांबिने शटरचे कोंडे तोडले सेंटरलॉकमुळे



**टाकरवण । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील टाकरवण येथे चोरट्यांचा सोन्याचे दुकान फोडण्याचा प्रयत्न फसला आहे. ही घटना गुरुवारी पहाटे च्या सुमारास घडली आहे. घटनेने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. टाकरवण परिसरात पोलिसांनी गस्त वाढवावी अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.

टाकरवण येथील मुख्य बाजार रोडवर दत्तात्रय काकडे यांचे श्री मंगलनाथ ज्वेलर्स नावाने सोन्याचे दुकान आहे. गुरुवारी पहाटे ३:३० वाजेच्या सुमारास चोरट्यानी चोरी करण्याच्या उद्देशाने श्री मंगलनाथ ज्वेलर्स दुकाना बाहेरील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे केबल कनेक्शन कट केले. त्यानंतर टांबीच्या साह्याने शटर चे दोन्ही बाजूचे कोंडे वाकवून तोडले. मात्र शटरला असलेल्या सेंटर लॉक मुळे या चोरट्यांचा चोरीचा मोठा प्रयत्न फसला असल्याने दुकान मालकाचे मोठे नुकसान टळले आहे. चोरट्यांनी अतिशय चाणक्षबुध्दीने कॅमेरामध्ये न येता कॅमेरे कनेक्शन बंद केले. मात्र या धाडसी चोरीच्या घटनेच्या प्रयत्नामुळे परिसरामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहेत. तरी परिसरात माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याकडून रात्रीच्यावेळी ग्रस्त वाढवण्यात यावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

**चोरटे सीसीटीव्हीत कैद**

गुरुवारी पहाटे टाकरवन परिसरात चोरट्यांचा चोरीचा प्रयत्न फसला आहे. ज्या ठिकाणी चोरीचा प्रयत्न केला तेथील कॅमेरे कनेक्शन तोडून बंद केले असले तरी. काही अंतरावर असलेल्या साईकृपा मेडिकल येथे काही वेळ चोरटे थांबले होते. तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये दोन चोरटे कैद झाले आहेत. तोंडाला रुमाल बांधलेला हातामध्ये चोरीसाठी आणलेले काही साहित्य त्यांच्याकडे असल्याचे दिसत आहे.

# आ. सुरेश धस यांच्या पाठपुराव्यामुळे अखेर स्व.महादेव मुंडे खून प्रकरणी विशेष तपास यंत्रणेची स्थापना

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा





**आष्टी । प्रतिनिधी**

गेल्या २१ महिन्यांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या स्व. महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणी अखेर विशेष तपास यंत्रणा एसआयटीची स्थापना करण्यात आली असून त्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदेश दिले आहेत आमदार सुरेश धस यांनी या हत्याप्रकरणी बसत्यात बांधलेला तपास करायला भाग पडल्याने अखेर विशेष तपस यंत्रणा स्थापन करण्यात आले असून यांच्या वतीने पुढील तपास करण्यात येणार आहे त्यामुळे स्वर्गीय महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे या प्रकरणात सातत्याने आवाज उठवत, न्यायासाठी लढा देणारे आमदार सुरेश धस यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे मुळेच आज मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष तपास पथक स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत.

आ. सुरेश धस यांनी आज मुंबईत स्व. महादेव मुंडे यांची पत्नी सौ. ज्ञानेश्वरी मुंडे व त्यांच्या कुटुंबीयांना सोबत घेऊन मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत आमदार धस यांनी संपूर्ण प्रकरणाचे गंभीर तपशील, खरे आरोपी कोण आहेत तसेच आरोपींना मदत करणारे पोलीस अधिकारी कोण आहेत याची सविस्तर माहिती मुख्यमंत्र्यांसमोर ठामपणे मांडली.

मुख्यमंत्री फडणवीस साहेबांनी या प्रकरणाची भावनिक व गांभीर्याने दखल घेत त्वरित पोलीस उपमहानिरीक्षक यांना एसआयटी स्थापन करण्याचे स्पष्ट आदेश दिले. या निर्णयामुळे मुंडे कुटुंबीयांना मोठा मानसिक आधार मिळाला असून, सत्य बाहेर येईल आणि गुन्हेगार कायद्याच्या तावडीत सापडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. स्व. महादेव मुंडेंना न्याय मिळेपर्यंत हा लढा थांबणार नाही, असा ठाम निर्धार आमदार सुरेश धस यांनी या प्रसंगी पुन्हा एकदा व्यक्त केला.

# उपळी कुंडलिका मध्यम तलाव भरून ओसंडून वाहू लागला

## पिण्याच्या पाण्याबरोबर जल सिंचनाचा प्रशन मिटला



**धारूर । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील उपळी कुंडलिका मध्यम प्रकल्प आज दि.३० रोजी ओव्हरफुल होऊन ओसंडून वाहू लागला आहे. यामुळे या परिसरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न व शेतीच्या पाण्याचा प्रश्न दोन वर्ष कायमस्वरूपी मिटला आहे. या तलावावर या परिसरातील गावांना पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन जलजीवनच्या पाईपलाईन मुख्यमंत्री पेज यांच्या पाईप लाईन तसेच शेतीला पाणी व लोकनेते सुंदरराव सोळुंके सहकारी साखर कारखाना तेलगाव यासाठीही याच तलावावरून साखर कारखान्याला पाण्याचा पुरवठा केला जातो, अशा परिस्थिती हा तलाव १०० % भरने खूप महत्वाचे आहे.

या वर्षी मे महिन्यातच पाऊस भरपूर झाल्यामुळे पुंडलिका तलाव मे महिन्यामध्ये ७० टक्के पूर्ण क्षमतेने भरलेला होता. राहिलेला ३०% कुंडलिकामध्ये प्रकल्प दिनांक ३० / ७ /२०२५ रोजी पूर्ण क्षमतेने भरून वाहू लागला आहे. यामुळे या परिसरातील ऊस बागायतदार शेतकरी सुखावला आहे. या पाण्यामुळे शेतीमध्ये शेतकरी पांढरे सोनं पिकवू लागलेला आहे. पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाबरोबरच जलसिंचनाचा हि प्रश्नही १००% मिटलेला आहे. सुजलाम सुफलाम बनवण्यासाठी हा तलाव शंभर टक्के शेतकऱ्यांना लाभदायी वरदान ठरत आहे. या परिसरात जवळजवळ पिण्याच्या पाण्यासाठी दहा ते वीस गावे जोडली गेली आहेत. याच तलावावरून धारूरला पाणी पिण्यासाठी नवीन पाईपलाईन मंजूर झालेली आहे आणि ते कामही सध्या प्रगतीपथावर दिसत असून धारूरकरांना पण याच तलावावरून पिण्याची पाणी भविष्यात मिळणार आहे. धारूर तालुक्यासह वडवणी तालुक्यात या तलावामुळे शेतकऱ्यांची नविन हरितक्रांती घडवून आणली आहे याच तलावावर पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नांसह शेतीला पाणी शेतकऱ्यांना पाणी दिले जाते, असे कालवा निरीक्षक पि.एस.कोळेकर यांनी सांगितले.

# भाजीपाला विक्रेत्यांमुळे वाहनधारक, नागरिकांना होतोय त्रास; नगरपालिकेने लक्ष देण्याची मागणी

## पालवण चौक परिसरात नगरपालिकेच्या वतीने भाजीपाला विक्रेत्यांसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्याची मागणी



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील पालवन चौक या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भाजीपाला विक्रेते हे रस्त्यावरच भाजीपाला विक्री करत असल्याने वाहनधारकांना आणि नागरिकांना ये जा करण्यास मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने बीड नगर पालिकेने याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

पालवण चौकातील पालवन रोड आणि आहेर धानोरा रोड या ठिकाणी अनेक भाजीपाला विक्रेते हे रस्त्यावरच भाजीपाला विक्रीसाठी बसत असल्याने वाहनधारकांना भाजीपाला त्रास होत आहे. अनेक भाजीपाला विक्रेते रस्त्यावर किंवा पदपथांवर भाजीपाला विकतात, ज्यामुळे वाहतूक कोंडी होते आणि लोकांना ये-जा करताना अडचणी येत आहेत. या भागातील मुख्य रस्त्यावर शाळा, दवाखाने असल्याने नेहमीच वर्दळ असते. भाजीपाला खरेदीदार रस्त्यावर उभ्या करतात. उभे राहिल्याने किंवा भाजीपाला विक्रेत्यांमुळे आणि उभ्या केलेल्या गाड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. लोकांना ये-जा करताना अडचणी येतात आणि त्यांना जास्त वेळ लागतो. भाजीपाला विक्रेते कचरा रस्त्यावरच टाकतात, ज्यामुळे परिसर अस्वच्छ होत आहे. आणि हा कचरा नगर पालिकेकडून उचलण्यास उशीर होत असल्याने याचा स्थानिक नागरिकांना देखील मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. या परिसरामध्ये भाजीपाला विक्रेत्यांसाठी स्वतंत्र जागा नसल्यामुळे, ते रस्त्यावर किंवा पदपथांवर भाजीपाला विकतात त्यांच्यासाठी बीड नगर पालिकेने तात्काळ स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्याची मागणी देखील नागरिकांकडून होत आहे.

# आझाद क्रांती सेनेची डाके पिंपरी येथे शाखा स्थापन



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी तालुक्यातील डाके पिंपरी या ठिकाणी आझाद क्रांती सेना ची शाखा स्थापन करण्यात आली तेथील युवकांनी आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख राजेश घोडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भव्य शाखा स्थापन केली. या शाखेचे उद्घाटन माजलगाव तालुकाप्रमुख अशोक ढगे यांच्या हस्ते करण्यात आले. डाके पिंपरी येथील असंख्य युवकांनी आझाद क्रांती सेनेमध्ये प्रवेश घेतला. या शाखा उद्घाटन प्रसंगी सेनाप्रमुख राजेश घोडे यांनी युवकांना मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले की, विषमतावादी व्यवस्था संपवण्यासाठी बंड करावे लागेल गरीब हा गरीब होत चालला आहे व श्रीमंत हा श्रीमंत होत चालला आहे. देशात एक वेगळी विषमता निर्माण होत चालली आहे ही विषमता संपवण्यासाठी आझाद क्रांती सेनेची मशाल आपण आज हातात घेतली आहे, ही मशाल तुम्ही तेवत ठेवा, या मशालीमध्ये आम्ही आमच्या रक्ताचं तेल करून टाकून ती ज्वलंत ठेवू आझाद क्रांती सेना हे फक्त नाव नसून हा एक विचार आहे. जो विस्थापित कुसाबाहेरील गरीब वंचित शोषितांचा आवाज म्हणजे आझाद क्रांतीसेना आहे. या संघटनेमध्ये अठरापगड जमातींना घेऊन हे संघटन मागासलेल्या समाजाला शैक्षणिक प्रवाहामध्ये आणण्यासाठी आझाद क्रांती सेनेचा जन्म झालेला आहे, असे मत आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रम प्रसंगी अशोक ढगे किसन भिसे शाहीर साळवे यांचीही भाषणे झाली हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील सरपंच रमेश जी आल्हाट जेष्ठ नागरिक युवा वर्ग मोठ्या प्रमाणामध्ये मोठ्या उत्साहामध्ये नऊ चेतन घेऊन सामील झाला होता. शहरांमधून भव्य मोटर सायकल रॅली काढून डाके पिंपरी येथे शाखेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी शाखेचे अध्यक्ष गणेश आल्हाट, उपाध्यक्ष लखन आलाट, महासचिव बालासाहेब आल्हाट, सहसचिव हनुमंत आढागळे, सल्लागार राम शेरकर, कोषाध्यक्ष बालासाहेब आल्हाट, सहसंघटक भागवत घोंगडे असून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील तरुणांनी परिश्रम घेतले.

धारूर तालुक्यात महसूल सप्ताहाचे १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत आयोजन

# नागरीकांनी सहभागी व्हावे : तहसीलदार निळे

**धारूर । प्रतिनिधी**



महसूल विभागाच्या वतीने साजरा केला जाणारा १ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यानचा महसूल सप्ताह धारूर तहसील कार्यालयाच्या वतीने ही तालुक्यात आयोजित करण्यात आला असून या निमित्ताने शासनाने निर्देश दिल्याप्रमाणे विविध कार्यक्रमाचे आयोजन या सप्ताहात करण्यात आले आहे. या सप्ताहात नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन तहसीलदार श्रीकांत निळे यांनी केले आहे.

राज्यात महसूल विभागाच्या वतीने १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट दरम्यान महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाचा शुभारंभ एक ऑगस्ट रोजी निवृत्त कर्मचारी व उत्कृष्ट काम करणाऱ्या महसूल कर्मचारी अधिकारी यांचा सत्कार करून करण्यात येणारा सून या सप्ताहामध्ये २०११ अगोदरची नियमनुकूल जागेतील पट्टेवाटप, पांदण व शेत रस्ता योजनेत दुतर्फा झाडे लावणे, छत्रपती शिवाजी महाराज महाराज मसाराजस्व अभियान मंडळ निहाय राबवणे, विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या घरांच्या भेटी देऊन डीबीटी करून अनुदान वाटप करणे, शासनाच्या जमिनीवर अतिक्रमणे काढून त्या जमिनी शासनाच्या ताब्यात घेणे, अशी विविध उपक्रम या सप्ताहामध्ये राबविण्यात येणार असून नागरिकांनी या सप्ताहात सहभागी होण्याचे आवाहन तहसीलदार श्रीकांत निळे यांनी केले आहे.

# तहसिलदार सुरेश घोळवे यांची कालिकादेवी विद्यालयास सदिच्छा भेट

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

दि.२८ जुलै २०२५ सोमवार रोजी शिरूर (का.) तालुक्याचे विद्यमान तहसिलदार सुरेश घोळवे व गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे यांनी, कालिकादेवी विद्यालयास सदिच्छा भेट दिली. शासण स्तरावरील 'एकाच वेळी वृक्षलागवड मोहिम राबविणे' या अंतर्गत तहसिलदार यांनी आदेशीत केल्या प्रमाणे, गटशिक्षणाधिकारी कार्यालय, शिरूर (का.) यांच्या वतीने कालिकादेवी विद्यालय, शिरूर (का.) येथे तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, मुख्याद्यापक व विविध विभागाचे प्रतिनिधी यांनी 'ऑगस्ट २०२५ मध्ये एकाच वेळी वृक्षलागवड मोहीम राबविणे' संदर्भात बैठक आयोजित केली होती. त्यानिमित्त कालिकादेवी विद्यालयात, तहसिलदार सुरेश घोळवे व गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे यांनी विद्यालयाचे मुख्याद्यापक तथा प्राचार्य केशव भांगे यांची सदिच्छा भेट घेतली. ही पहिलीच भेट असल्यामुळे शिरूर (का.) तालुक्याचे तहसिलदार सुरेश घोळवे व प्रशांत शिंदे या उभयतांचे विद्यालयाच्या वतीने प्राचार्य केशव भांगे साहेबांनी मनापासून आभार मानले आणि शाल, श्रीफळ व बुके देऊन स्वागत केले.



तालुक्यातील एक नामांकित शाळा म्हणून ओळखली जाणारी कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या शाळेची पाहणी केली असता; त्यामध्ये शाळेची स्वतंत्र इमारत व तसेच वरीष्ठ महाविद्यालयाची सुसज्ज इमारत, प्रशस्त वर्गखोल्या, भरपूर फर्निचर, भव्य क्रीडांगण, पिण्यासाठी शुद्ध, स्वच्छ असे मुबलक पाणी, वीज, शौचालय व इतर भौतिक सुविधांची पाहाणी केली. तसेच विद्यालयातील विद्यार्थी संख्या, कनिष्ठ महाविद्यालतील तीनही शाखेची वर्गनिहाय विद्यार्थी संख्या आणि इ.१० वी वर्गाचा बोर्ड परीक्षेचा निकाल व इ.११ वी, १२ वी कला, विज्ञान व वाणिज्य शाखेचा निकाल व दैनंदिन तासिका, अशा विविध उपक्रमांची पाहणी केली असता, समाधान व्यक्त केले आणि विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबरोबरच उच्च विद्याविभूषीत असणारा सूज्ञ व अनुभवी, प्राध्यापक वर्ग, शिक्षकवर्ग आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांची संख्या पाहून कालिकादेवी विद्यालयाचे विशेष कौतुक केले. आणि विद्यमान प्राचार्य केशव रामराव भांगे साहेबांचे मनापासून अभिनंदन केले. तसेच प्राचार्य भांगे सरांच्या सर्व सहकारी टिमला सब्बासकी दिली.

शैक्षणिक प्रगतीच्या अनुशंगाने अनेकविध विषयावर सविस्तर अशी चर्चा केली. अशा प्रकारे विविध शासकीय कार्यक्रमासाठी कालिकादेवी विद्यालयाने नेहमीच व मनापासून सहकार्य केले आहे. आजही प्राचार्य भांगे साहेबांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली, अतिशय सुंदर अशी बैठक व्यवस्था उपलब्ध करून दिली त्याबद्दल प्राचार्य भांगे साहेबांचे तहसिलदार सुरेश घोळवे व गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे यांनी मन:पूर्वक आभार मानले.

# घोटाळेबाज विष्णू घुलेचा येणाऱ्या निवडणुकीत जणताच करणार पर्दाफाश

## दलितांच्या गायरान जमिनी बळकावणारा व जलजीवन योजनेमध्ये कोट्यावधींचा घोटाळा करणाऱ्या विष्णू घुलेला जनता स्वीकारेल?

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या निवडणुकांचे बिगुल वाजले असून उत्सुक उमेदवार मैदानात उतरल्याचे पाहायला मिळत आहे. जिल्हा परिषदेचे सहा गण असून यामध्ये चांगलीच चुरस रंगणार असल्याची चर्चा जोर धरून आहे.



चिंचोली माळी सर्कल व येवता सर्कल मधून भाजपचे विष्णू घुले इच्छुक असल्याचे बोलले जात आहे. परंतु चिंचोली माळी सर्कल मध्ये जलजीवन योजनेमध्ये कोट्यावधींचा घोटाळा केल्यामुळे येथील नागरिक त्यांच्यावर नाराज असून त्यामुळेच ते येवता जिल्हा परिषद गटाचा कानोसा घेत आहेत. पण येथील नागरिक सुद्धा अशा घोटाळेबाज नेत्याला स्वीकारण्यास तयार नसल्याचे पहावयास मिळत आहे. स्वत:चे टाकळी गाव येवता सर्कल मध्ये असल्यामुळे त्यांना ही लढाई सोपी वाटत असावी, परंतु स्वत:च्या याच गावाने त्यांना ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत धूळ चारली असल्याने, गावच त्यांच्या विरोधात असल्याचे दिसून येत आहे. या सर्व समीकरणांचा विचार केल्यास त्यांचे राजकारण कुठेतरी स्वत:हून संपुष्टात आणल्याचे निदर्शनास येत आहे.

शाळेच्या नावाने व आपल्या राजकीय ताकतिच्या जोरावर शहरातील चार एकर मोक्याची जागा त्यांनी बळकावल्याचे उघड झाले आहे. भूमिहीन दलितांच्या हक्काच्या या जागेला शाळेच्या नावाने बळकावल्यामुळे दलित वर्ग त्यांच्यावर नाराज आहे. फक्त पैशाच्या जोरावर राजकारण करणाऱ्या विष्णू घुले यांना निवडणुकीतून त्यांना त्यांची जागा दाखवायचीच असे आता जनतेतून बोलले जात आहे.

# बीड नगर परिषदेतील स्वच्छतेचे तीन तेरा

## लवकरात लवकर स्वच्छता करा, व्यापारी आक्रमक बीड नगर परिषद मुख्य अधिकारी यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

नगर परिषद हद्दितील आठवडी बाजार भाग, मोमीनपूरा मुख्य रस्ता, नवीन भाजी मंडई परिसर, राजीवगांधी चौक परिसर, नगर नाका मच्छि मार्केट परिसर व पालवन चौक मधील परिसर व्यापारी वर्गा करिता स्वच्छ करा, आम्ही बीड नगर परिषद हद्दीतील दैनंदिन व आठवडी बाजार मधील व्यापारी असून आमच्याकडून ठेकेदार मार्फत कर म्हणून १० व २० रुपये प्रमाणे घेतले जात असून ते आम्ही देत आहोत. आमचेकडुन कर घेतले जात असतांना आम्ही ज्या जागी आठवडी बाजार, नवीन भाजी मंडई, पालवन चौक, मोमीनपुरा या भागामध्ये बसतो त्याजागी आपले कार्यालयच्या स्वच्छता कर्मचाऱ्याकडुन स्वच्छता केली जात नसल्यामुळे आम्हाला घाणीवर बसून आमचा व्यापार करावा लागत आहे घाणीच्या दुर्गंधीमुळे आम्हाला रोगराईचा धोका निर्माण होत असून भाजी पाला व फळे वर गंभीर स्वरुपाचे जंतू बसत असल्यामुळे आमचे व भाजी पाला व फळामुळे जनतेचे आरोग्य पण धोक्यात आले आहे. इतर मागण्यांसाठी बीड नगरपरिषद येथील व्यापारी आक्रमक होऊन मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.



निवेदनात म्हटले आहे की, आमचे आठवडी बाजार दर रविवारी सकाळी पुर्ण पणे स्वच्छ करुन दयावे व आठवडी बाजारामधील मोकाट जनावरे कोंडवाडयामध्ये टाकावे कारण की मोकाट जनावरामुळे बाजारामध्ये चोही कडे शेन पसरलेले दिसत आहे तसेच भाजी मार्केट आतमधील घाण आठवडयात तीन वेळेस सवच्छ करुन दयावे. आपल्या कर्माचाऱ्यांना वेळोवेळी सांगूनही ते पूर्णपणे परिसर स्वच्छ न करता निघून जाते. आठवडी बाजार परिसरमध्ये घाण असल्या कारणाने दानशे ते तीनशे भाजीपाला विक्रेते सुभाष रोड वर बसून व्यवसाय करीत असल्यामुळे नागरीकांना येणे जाणे साठी रहदारीस अडथळा होत आहे. मुख्याधिकारी यांनी आमचे मागण्या मान्य करावे नसता आम्ही नाइलाजास्तव आपल्या कार्यालयासमोर येणाऱ्या काळात उपोषणाला बसेल अशी आक्रमक भूमिका घेतली. यावेळी व्यापाऱ्यांचे शिष्ठमंडळा सोबत मुकरमजान पठार, संतोष चव्हाण, छीनने, गणेश राधाकीशन, संतोष लाला, शेख नदीम, मोमीन वसीम ईफ्तेखार बागवां, गणेश थेटे यांचासह आनेक जण उपस्थित हजर होते.

# आदित्य पाटील यांची काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीसपदी निवड

**केज । प्रतिनिधी**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेश समितीच्या सरचिटणीस पदावर आदित्य पाटील यांची नुकतीच नियुक्ती झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. ही निवड पक्षाच्या भविष्यासाठी एक सकारात्मक पाऊल असून तरुण नेतृत्वाला संधी देण्याच्या काँग्रेस पक्षाच्या धोरणाची ही ठळक निशाणी आहे.



आदित्य पाटील हे अत्यंत अभ्यासू, दूरदृष्टी असलेले आणि समाजाभिमुख नेतृत्व म्हणून ओळखले जातात. स्थानिक स्तरावरून सुरू झालेला हा प्रवास आता राज्यस्तरावर पोहोचलेला आहे. त्यांच्या नेतृत्वात युवक काँग्रेस, आणि जिल्हा कार्यकारिणीमध्ये विशेष कामगिरी केली आहे. ग्रामीण भागातील समस्या, शेतकऱ्यांचे हक्क, शिक्षण आणि रोजगार यांसारख्या मुद्द्यांवर त्यांचा ठाम आणि स्पष्टवक्ता दृष्टिकोन पक्षासाठी नेहमीच मार्गदर्शक ठरलेला आहे.

**काँग्रेस पक्षाची विश्वासू निवड**

महाराष्ट्रातील राजकारणात सध्या अस्थिरतेचे वारे आहेत. अशा परिस्थितीत आदित्य पाटील यांच्यासारख्या तरुण, ऊर्जावान आणि ध्येयवेड्या नेत्याला सरचिटणीसपदाची जबाबदारी देणे ही पक्षाच्या नवविचारांची आणि नवसंजीवनीची साक्ष आहे. सरचिटणीस या पदावर काम करताना पक्ष संघटन बळकट करणे, युवकांना जोडणे, आगामी काळातील निवडणुकांसाठी रणनीती आखणे या मुख्य जबाबदाऱ्या आदित्य पाटील यांच्या खांद्यावर असतील. त्यांचा अनुभव, विचारशैली आणि लोकांशी असलेला थेट संवाद निश्चितच काँग्रेस पक्षाच्या पुनरुज्जीवनासाठी उपयुक्त ठरेल. निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT